मार्च, २०२३ मध्ये राज्यातील विविध जिल्ह्यात अवेळी पावसामुळे झालेल्या शेतीपिके नुकसानीसाठी बाधितांना मदत देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : सीएलएस-२०२३/प्र.क्र.७०/म-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २१ एप्रिल, २०२३.

वाचा :

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.६७/म-११,दि.२४.०१.२०२३.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस-२०२२/प्र.क्र.३४९/म-३, दि.२७.०३.२०२३
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग समक्रमांक, दि.१०.०४.२०२३
४) विभागीय आयुक्त, कोकण यांचे पत्र क्र.मशा/कार्या-६/नै.आ./मार्च-२०२३अबकड/कावि/२०२३, दि. १३.०४.२०२३
५) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र.मशा-७(५)/नैआव्य/कावि-१२४/२०२३, दि.२०.०४.२०२३

प्रस्तावना:-

अतिवृष्टी, पूर व चक्रीवादळ या सारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास पुढील हंगामामध्ये उपयोगी पडावे याकरिता शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान (Input subsidy) स्वरूपात एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून विहित दराने मदत देण्यात येते. तसेच, राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या इतर मान्य बाबींकरिता देखील विहित दराने मदत देण्यात येते. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.सीएलएस-२०२२/प्र.क्र.३४९/म-३, दि.२७ मार्च, २०२३ अन्वये, राज्यात विविध नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीकरिता मदत देण्यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे सुधारित दर व निकष दि.१ नोव्हेंबर, २०२२ पासून लागू करण्यात आलेले आहेत.

२. राज्यात माहे मार्च, २०२३ (दि.४ ते ८ मार्च व दि.१६ ते १९ मार्च, २०२३) या कालावधीत पडलेल्या अवेळी पावसामुळे मुख्यत्वे: शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. अवेळी पाऊस ही राज्य शासनाने घोषित केलेली आपत्ती असून शेतीपिकांचे नुकसान ३३ टक्केपेक्षा जास्त असल्यास जेवढ्या क्षेत्राचे नुकसान झाले आहे, तेवढ्या क्षेत्राकरिता विहित दराने निविष्ठा अनुदान स्वरुपात शेतकऱ्यांना मदत देण्यात येते. राज्यात मार्च, २०२३ या कालावधीत झालेल्या अवेळी पावसामुळे झालेल्या शेतीपिके व इतर नुकसानीबाबत अनुज्ञेय दराने शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत सर्व विभागीय आयुक्त यांच्याकडून विहित नमुन्यात प्रस्ताव दि.८ मार्च, २०२३ च्या शासन पत्रान्वये मागविण्यात आले होते. विभागीय आयुक्त, अमरावती, नाशिक, पुणे व औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त झालेल्या निधी मागणी प्रस्तावांनुसार दि.१०.०४.२०२३ च्या शासन निर्णयान्वये निधी वितरणास मान्यता देण्यात आलेली आहे. आता विभागीय आयुक्त, कोकण व नागपूर यांच्याकडून निधी मागणीचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यानुसार निधी वितरणास मान्यता देण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

मार्च, २०२३ या कालावधीत राज्यातील विविध जिल्ह्यात अवेळी पावसामुळे झालेल्या शेतीपिके नुकसानीसाठी बाधितांना मदत देण्याकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून संदर्भ क्र. २ येथील शासन

निर्णयान्वये निश्चित केलेल्या दरानुसार शेतीपिके नुकसानीसाठी एकूण **रु.२७१८.५२ लक्ष (अक्षरी रुपये सत्तावीस कोटी अठरा लक्ष बावन्न हजार फक्त)** इतका निधी सोबतच्या प्रपत्रात दर्शविल्यानुसार जिल्हानिहाय वितरीत करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्रात लेखाशीर्षनिहाय दर्शविल्याप्रमाणे कार्यासन म-११ यांनी आवश्यकतेनुसार हा निधी वितरित करावा. सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांनी वर अनुक्रमांक १ येथे नमूद दि.२४ जानेवारी, २०२३ अन्वये सूचित केल्यानुसार या प्रस्तावाअंतर्गत असलेल्या शेतीपिकांच्या नुकसानीच्या सर्व लाभार्थ्याची माहिती विहित नमुन्यात तयार करुन ती संगणकीय प्रणालीवर भरावी. ही माहिती भरतांना द्विरूक्ती होणार नाही व राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषांचे पालन होईल याची खात्री करण्यात यावी.

३. वरील निधी खर्च करताना सर्व संबंधित शासन निर्णयातील सुचनांचे व निकषांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. संदर्भाधीन क्र.२ येथील दि.२७ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयान्वये राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून द्यावयाच्या मदतीचे सुधारित दर मंजूर करण्यात आले आहेत. या दराने व निकषानुसार मदत प्रदान करण्यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या लेखाशीर्षाखाली वितरित करण्यात आलेला निधी खर्च करण्यात यावा. ज्या प्रयोजनासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी सदर निधी खर्च करण्यात यावा. ही मदत देताना केंद्र शासनाने चक्रीवादळ, पूर इत्यादी नैसर्गिक आपत्तीकरिता विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता होत असल्याची खात्री सर्व संबंधितांनी करावी. तसेच द्विरुक्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी.

४. लाभार्थ्यांना मदत वाटपाची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांची यादी व मदतीचा तपशील जिल्हयांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा. या सर्व सूचनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

५. सदर निधीतून करण्यात येत असलेल्या खर्चाचे लेखे निधी आहरित करण्यात येणाऱ्या कार्यालयाच्या स्तरावर ठेवण्यात यावे व करण्यात आलेल्या खर्चाचा कोषागार कार्यालये व महालेखापाल कार्यालयाशी त्रैमासिक ताळमेळ घेण्यात यावा. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून तसेच राज्य शासनाच्या निधीमधून उपलब्ध करून दिलेला उपरोक्त निधी खर्ची पडल्यानंतर तातडीने निधीची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधितांकडून प्राप्त करून घेवून एकत्रितरित्या शासनास सादर करण्याची जबाबदारी विभागीय आयुक्त यांची राहील.

६. वरील प्रयोजनासाठी प्रधान लेखाशीर्ष २२४५ - नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय, ०२ पुर चक्रीवादळे इत्यादी अंतर्गत सोबतच्या विवरणपत्रात दर्शविलेल्या लेखाशिर्षाखाली आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये उपलब्ध असलेल्या निधीमधून खर्च करण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२३०४२११२३१०८७६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RELIEF AND REHABILITATION DEPARTMENT, 2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee23011448b7fc64d138630b9c76ae7a2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FCF7172A73579B34FA622983D8FB647780FBEF1D35A1CA975955EB9193F3F800, cn=SANJAY AUDUMBAR DHARURKAR
Date: 2023.04.21 19:36:06 +05'30'

(संजय औ. धारूरकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई,
२. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
३. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानभवन,मुंबई
४. विधानमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य,
५. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई,
६. सर्व विभागीय आयुक्त.
७. सर्व संबंधित जिल्हाधिकारी.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
९. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१०. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
११. अधिदान व लेखा अधिकारी, बृहन्मुंबई.
१२. सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
१३. वित्तिय सल्लागार व सहसचिव मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१४. कार्यासन अधिकारी (म-११/ब-१), मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१५. वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६),मंत्रालय,मुंबई
१६. निवड नस्ती (कार्यासन/ म-३).

शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस-२०२३/प्र.क्र.७०/म-३, दि. २१ एप्रिल,२०२३
सोबतचे प्रपत्र

मार्च २०२३ मध्ये अवेळी पावसामुळे झालेल्या शेतीपिके नुकसानीकरिता वितरित करावयाच्या मदतीच्या निधीचा लेखाशिर्षनिहाय तपशिल

अ. क्र.	जिल्हा	शेतकरी संख्या	शेतीपिकांचे बाधित क्षेत्र (२ हे.पर्यंत)	एकुण निधी रु. लाखात
				२२४५ २४५२
१	नागपूर	५५४०	४४४१.६०	९०७.४६
२	भंडारा	५९१	१२८.१८	२१.८१
३	गोंदिया	४५७	१५०.५०	२५.४०
४	चंद्रपूर	९५८	३७५.९५	५४.३१
५	गडचिरोली	२६३२	१२५७.२८	१७८.०५
एकुण नागपूर		**१०१७८**	**६३५३.५१**	**११८७.०३**
६	ठाणे	१९८४	५३०.२७	११५.६०
७	पालघर	२५४२९	५२८६.५८	११५०.८०
८	रायगड	३८३४	११८०.८५	२६१.३७
९	रत्नागिरी	०	०.००	०.००
१०	सिंधुदूर्ग	५१	१६.५१	३.७२
एकूण कोकण		**३१२९८**	**७०१४.२१**	**१५३१.४९**
एकुण राज्य		**४१४७६**	**१३३६७.७२**	**२७१८.५२**